REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# जनहित याचिका : न्यायदानाचा एक नवा आयाम



**दत्तात्रय शिवाजी थोरात**
सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र)
सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते
ता. माळशिरस, जि. सोलापूर (महाराष्ट्र—भारत)

## ● प्रस्तावना :

प्रचलित न्यायव्यवस्थेमध्ये अन्यायग्रस्त असणाराच न्यायाची मागणी करू शकतो. न्याय या राज्यशास्त्रीय संकल्पनेचे हे एक महत्वपूर्ण लक्षण आहे. यामध्ये न्यायमंडळाच्या सक्रियतेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. आपल्यावर अन्याय होतो आहे, त्याला वाचा फोडण्यासाठीची व्यवस्था उपलब्ध आहे, मात्र या न्यायव्यवस्थेच्या पध्दती आणि तंत्राच्या माध्यमातून अधिकारिकतेची जाणीव प्राप्त होत नाही. अशावेळी न्यायमंडळच स्वतः पुढाकार घेते परंतु या पुढाकारासाठी खटल्याची आवश्यकता असते.

न्यायव्यवस्थेच्या पारंपारिकतेला छेद देत जगामध्ये पहिल्यांदा एखाद्यावर होणाऱ्या अन्यायाची दखल घेत तटस्थ व्यक्तीने न्यायव्यवस्थेकडे दाद मागण्यास अकेरिकेत सुरूवात झाली. यालाच ‘जनहित याचिका’ असे म्हणतात. भारताच्या सर्वोच्च न्यायालयानेही एकोणीसशे नव्वदच्या दशकात सकारात्मक सक्रियता दाखविण्यास सुरूवात केली, यातूनच भारतामध्येही ‘जनहित याचिका’ हा एक न्यायदानाचा नवा आयाम निर्माण झाला.

## ● जनहित याचिकेचा उगम व विकास :

इ.स.1975—76 साली सर्वप्रथम अमेरिकेत ही संकल्पना उदयास आली. वंचित घटकांना कायदेशिर पध्दतीने हितसंबंधीतांकरवी बाजू मांडण्याची संधी मिळावी, म्हणून अमेरिकेत ही संकल्पना उगम पावली, तेथेच याचा विकासही झपाट्याने घडून आला.

भारतामध्ये सन 1990 नंतर न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्ण अय्यर आणि न्यायूर्ती पी. एन. भगवती यांच्या प्रेरणेने जनहित याचिकेच्या संकल्पनेला सूरूवात झाली. योगायोगाने वंचित घटक, गरीब आणि अज्ञानी आपल्या प्रतिकूल सामाजिक—राजकीय—आर्थिक परिस्थितीमूळे आपल्या न्याय अधिकारासाठी न्यायालयात जाऊ शकत नाहीत. अशांना न्यायाची संधी उपलब्ध करण्याची भूमिका जनहित याचिका संकल्पनेपाठीमागे आहे. या माध्यमातून वंचित घटकांच्या वतीने कोणतीही व्यक्ती किंवा संघटना किंवा संस्था न्यायालयाकडे उचित स्वरूपामध्ये न्याय मागू शकते. म्हणजेच कोणीही व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी किंवा अन्यायाचे निराकरण करण्यासाठी न्यायालयाकडे दाद मागू शकते.

## ● जनहित याचिका संकल्पनेची वैशिष्टे :

न्याय आणि कायद्याचे राज्य प्रत्यक्षात आणण्यासाठी दुर्बल घटकांना न्यायाची हमी देण्यासाठी आणि मूलभूत अधिकारांच्या यशस्वितेसाठीचा उद्देश समोर ठेऊन जनहित याचिका ही संकल्पना अस्तित्वात आली. तिची काही मुलभूत वैशिष्टे आहेत.

1. **कायदेविषयक सहाय्याची चळवळ :—** गरीब आणि अडाणी जनतेला न्यायाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांना कायदेविषयक सहायता मिळविण्यासाठीची एक न्यायाधिष्ठित चळवळ म्हणजे जनहित याचिकेची संकल्पना आहे.
2. **पारंपारिक न्यायाच्या संकल्पनेला छेद :—** पारंपारिक न्यायिक खटल्यामध्ये दोन पक्ष असतात. येथे तिसऱ्या पक्षाला संधी नसते. मात्र जनहित संकल्पनेच्या माध्यमातून याला छेद देवून तटस्थ अशा तिसऱ्या पक्षाला न्यायिक खटला चालविण्याची संधी दिली जाते.
3. **सार्वजनिक हिताला महत्व :—** या संकल्पनेत एक विरूध्द दुसरा यांच्यात हस्तक्षेप करण्यापेक्षा सार्वजनिक हित साध्य करून त्या विकासाला चालना देण्याची भूमिका असते.
4. **घटनात्मक अधिकारांची अंमलबजावणी :—** गरीब, अडाणी, अज्ञानी लोकांच्या घटनात्मक व कायदेशिर अधिकारांच्या अंमलबजावणीची एक न्यायिक उपाययोजना म्हणून या संकल्पनेकडे पाहिले जाते.
5. **सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय :—** समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायाची हमी देण्याचे काम या माध्यमातून केले जाते. विखुरलेले अधिकार आणि दुर्बलांच्या हितसंबंधांना बाधा निर्माण न होता सार्वजनिक हित साधण्याचा हेतू यापाठीमागे आहे.

## ● मार्गदर्शक तत्वे :

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिकासाठी सन 1992 मध्ये मार्गदर्शक तत्वे बनविली. या मार्गदर्शक तत्वांमध्ये सन 2003 मध्ये सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार पुढील बाबींचा येणाऱ्या पत्रांना व अर्जानाच जनहित याचिका असे म्हणता येईल.

1. वेठबिगारी संबंधित मुद्दे
2. दुर्लक्षित मुल्ये
3. कामगारांना किमान वेतन न देणे, हंगामी कामगारांची पिळवणूक (व्यक्तिगत बाबी वगळता) कामगार कायद्याच्या उल्लंघनाबाबत तक्रारी.
4. छळ, मुदतपूर्व सूटका आणि तुरूंगात 14 वर्षे पूर्ण केल्यानंतर सूटकेची मागणी, तुरूंगात मृत्यू, बदली, व्यक्तिगत हमीपत्रावर सूटका, हक्क म्हणून वेगाने खटला चालविणे यासंबंधी तक्रार करणारे तुरूंगातून येणारे अर्ज.
5. दावा नोंदवून घेण्यासाठी पोलीसांचा नकार, पोलीसांकडून होणारा छळ आणि पोलीस कोठडीत मृत्यू याबाबत पोलीसांविरूध्दचे अर्ज.
6. महिला अत्याचार— विशेषतः बायकाचा छळ, तिला जाळणे, बलात्कार, खून, अपहरण इत्यादी याविरूध्दचे अर्ज.
7. इतर गावकऱ्यांकडून किंवा पोलीसांकडून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गावकऱ्यांचा छळ व यातना याविरूध्द तक्रार करणारे अर्ज.
8. पर्यावरणीय प्रदुषण, परिस्थितीकीय संतुलनाची हानी, अंमली पदार्थ, अन्नधान्य भेसळ, संस्कृती, पुरातन वस्तु, वने व वन्यजीवन यांचे रक्षण आणि सार्वजनिक महत्वाच्या इतर बाबी यासंबंधीत अर्ज.
9. दंगल प्रभावीत लोकांचे अर्ज.
10. कौटुंबिक निवृत्तीवेतनाच्या बाबतचे अर्ज

## ● खालील प्रकारात येणाऱ्या बाबी जनहित याचिका गणल्या जाणार नाहीत.

1. जमिन, मालक, भाडेकरू यांच्यातील वाद.
2. सेवाविषयक बाबी आणि निवृत्तीवेतन व उपदान यासंबंधीत बाबी.
3. केंद्र किंवा राज्य सरकार विभाग आणि स्थानिक संस्था याविरूध्द वरील 1 ते 10 विषय वगळून इतर तक्रारी.
4. वैद्यक व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश.
5. उच्च न्यायालये आणि दुयम न्यायालये यामध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांची त्वरेने सुनावणी व्हावी यासाठी अर्ज.

(संदर्भ : एम. लक्ष्मीकांत, श्रीकांत गोखले (अनु.) इंडियन पॉलिटी, के' सागर पब्लिकेशन, 2017 (प्रथमावृत्ती), पुणे पान नं.378)

- **जनहित याचिकेचा दुरूपयोग टाळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने पुढील मार्गदर्शक तत्ते सांगितली आहेत.**

1. न्यायालयाने खऱ्या व विश्वासार्ह जनहित याचिकांना प्रोत्साहन दिले पाहिजे व अयोग्य कारणांसाठी दाखल केलेल्या जनहित याचिकांना प्रोत्साहन न देता अशा याचिका दाखल होण्यास आळा घातला पाहिजे.
2. जनहित याचिकेबाबत प्रत्येक न्यायाधिशाने आपापली प्रक्रिया ठरविण्याऐवजी योग्य कारणांसाठी असलेल्या जनहित याचिकांना प्रोत्साहन देण्यासाठी व संदिग्ध उद्दिष्टांसाठी असलेल्या जनहित याचिकांना आळा घालण्यासाठी प्रत्येक उच्च न्यायालयाने सुव्यवस्थित नियम ठरविणे योग्य ठरेल.
3. अर्ज दाखल करण्यापूर्वी न्यायालयाने सकृतदर्शनी अर्जदाराची विश्वासार्हता तपासावी.
4. अर्ज दाखल करण्यापूर्वी अर्जातील माहिती सकृतदर्शनी बरोबर आहे, याची न्यायालयाने खात्री करून घ्यावी.
5. अर्ज स्वीकारण्यापूर्वी यामध्ये विस्तृत जनहित आहे, याची न्यायालयाने खात्री करून घ्यावी.
6. ज्या अर्जामध्ये व्यापक जनहित गुंतले आहे, त्याचे गांभीर्य व निकड विचारात घेऊन इतर अर्जांपेक्षा त्यांना अग्रक्रम दिला जाईल, हे न्यायालयाने सुनिश्चित करावे.
7. अर्ज स्वीकारण्यापूर्वी त्या अर्जाचा उद्देश प्रत्यक्षातील सार्वजनिक नुकसान व त्रास निवारण करण्यासाठी आहे, याची न्यायालयाने खात्री करून घ्यावी. जनहित दाखल करण्यामागे कोणताही व्यक्तिगत लाभ, खाजगी व संदिग्ध उद्देश नाही, हे सुनिश्चित करावे.
8. विचित्र किंवा अंतस्थ उद्देष्टांसाठी लुडबुड्या व्यक्तींनी केलेल्या अर्जांना आळा घालण्यासाठी त्यांना जरब बसेल असा दंड किंवा तशीच नाविन्यपूर्ण कल्पना वापरून शुल्लक आणि अवाजवी कारणांसाठीच्या अर्जांना आळा घातला जाईल, हे न्यायालयाने सुनिश्चित करावे.

(संदर्भ : एम. लक्ष्मीकांत, श्रीकांत गोखले (अनु.) इंडियन पॉलिटी, के' सागर पब्लिकेशन, 2017 (प्रथमावृत्ती), पुणे पान नं.380)

- **समारोप / निष्कर्ष :**

पारंपारिक न्यायिक प्रक्रियेला छेद देवून नवीनतम अशा व्यापक न्यायदान प्रक्रियेचा भाग म्हणून जनहित याचिकेची संकल्पना उदयास आली. जगामध्ये आणि भारतामध्ये या संकल्पनेचा दमदार विकास घडून आला आहे. दूर्बल आणि वंचितांनाही आपल्या अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव होवू लागली आहे. सार्वजनिक हितसंबंध जोपासणाऱ्या व्यक्तींची संख्या यामुळे वाढीला लागली आहे.

सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय दूर्बल घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या कामी जनहित याचिका महत्वपूर्ण भूमिका बजाविताना दिसतात. न्यायपूर्ण आणि कायद्याच्या राज्याची इष्टापत्ती (उपलब्धी) होण्यास मोठा वाटा जनहित याचिकांचा आहे. न्यायव्यवस्था अधिकाधिक विश्वासार्ह आणि लोकाभिमूख होण्यास यामुळे मदत होते आहे.

- **संदर्भ :**

**मराठी / हिंदी**

1. काश्यप सुभाष, हमारा संविधान–भारत का संविधान और संवैधानिक विधि, राष्ट्रीय पुस्तक न्यास, 2015, (तिसरी आवृत्ती) नई दिल्ली.
2. जैन पुखराज, बी. एल. फडिया, भारतीय शासन एवं राजनीति, साहित्य भवन पब्लिकेशनन्स, 2010, आगरा.
3. बसु दुर्गा दास, भारत का संविधान एक परिचय, Lexis Nexis, गुडगाव.
4. लक्ष्मीकांत एम., श्रीकांत गोखले (अनु.) इंडियन पॉलिटी, के' सागर पब्लिकेशन, 2017 (प्रथमावृत्ती), पुणे
5. लक्ष्मीकांत एम., भारत की राज्यव्यवस्था, Mcgraw Hill Education, 2014, नई दिल्ली.
6. जनता दल विरूध्द एच. एस. चौधरी, 1992
7. गुरूवायूर देवस्वम व्यवस्थापन समिती विरूध्द सी. के. राजन, 2003.

8. बाल्को कामगार संघटना विरूध्द भारतीय संघराज्य, 2002.
9. उत्तराखंड राज्य विरूध्द बलवंत सिंग चौपाल, 2010.

## English

1. Fadia B. L., Indian Government and Politics, Sahitya Bhawan Publications, 2011, Agra.
2. Sathe S. P., Judicial Activism in India, oxford University press, 2002, New Delhi.

LBP PUBLICATION